



कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

## संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम

वर्ष तिसरे । अंक ८ वा । जुलै ते सप्टेंबर २०२२

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर




प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** - धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती** -
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ** - सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** - प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** - 0217/2600481 /82
**ई-मेल** -
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## अंतरंग ...

१ महाकवी कालिदास दिन संगमेश्वरमध्ये उत्साहात... पान ३

२ जेईई मेन्समध्ये संगमेश्वरच्या मृण्मयीला ९९.३६ तर अथर्वला ९७.३८ पर्सेंटाइल... पान ४

३ ' हर घर तिरंगा ' उपक्रमा अंतर्गत संगमेश्वर संकुलांच्या वतीने तिरंगा अभिवादन...पान ५

४ संगमेश्वर कॉलेजमध्ये ' हर घर तिरंगा ' उपक्रमाअंतर्गत ध्वज वितरण ... .पान ६

५ अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी साजरा.... पान ७

६ स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त निबंधलेखन स्पर्धेचे बक्षीस वितरण...पान १०

७ 'राष्ट्रवंदना' भित्तीपत्रिकेचे उद्घाटन... पान १२

८ क्षेत्रभेटी अंतर्गत कला शाखेचा ऐतिहासिक स्थळ भेटीचा उपक्रम ... पान २१

९ राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात ...पान २२

१० कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या ११३ व्या जयंतीदिनी आयोजितऑनलाइन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे अक्षय इळके, यश पाटील विजेते .... पान २७

११ संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण ...पान २९

१२ सातत्यपूर्ण योग्य सरावाने क्रीडा क्षेत्रात उत्तम करियर - अनिल पाटील ....पान ३२

१३ चित्रप्रदर्शन व प्रात्यक्षिक कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविदयालयाचा उपक्रम... पान ३३

# कालिदासाचे साहित्य कलाप्रेमीत आजही लोकप्रिय
## - डॉ. रमाकांत अयाचित
## महाकवी कालिदास दिन संगमेश्वरमध्ये उत्साहात






सोलापूर (दिनांक प्रतिनिधी ) कालिदासाचे विज्ञानवादी साहित्य  कलाप्रेमीत आजही लोकप्रिय आहे.महाकवी कालिदास यांनी आषाढ महिन्यातील पहिल्या दिवशी आपल्या मेघदूत या खंड काव्याची निर्मिती केली तेव्हापासून हा दिवस  कालिदास दिन म्हणून साजरा केला जातो. साहित्यातून ज्ञान,संस्कृती, शृंगार , सिद्धांत, या सगळ्यांची दृष्टी वाचकांना कालिदासानी दिली. असे प्रतिपादन

डॉ. रमाकांत अयाचित यांनी केले.ते संगमेश्वर कॉलेजमध्ये कनिष्ठ विभाग अंतर्गत भाषा संकुला तर्फे महाकवी कालिदास दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.मंचावर उपप्राचार्य  प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, भाषा समन्वयक शिवराज पाटील, संस्कृतचे प्रदीप आर्य उपस्थित होते.

डॉ. रमाकांत अयाचित पुढे म्हणाले की,  " महाकवी कालिदास यांचे साहित्य हे समकालीन मूल्यांवर आधारित आहे .याचे अनेक दाखले दिले ज्ञान विज्ञान संस्कृती आणि शृंगार रहस्य सिद्धांत यासोबतच सादरीकरणात विविध शैली त्यांच्या परंपरा या सर्वांचा सुरेख संगम आपणास त्यांच्या साहित्यामधून दिसून येतो."

डॉ. रमाकांत अयाचित पुढे म्हणाले की,  " महाकवी कालिदास यांचे साहित्य हे समकालीन मूल्यांवर आधारित आहे .याचे अनेक दाखले दिले ज्ञान विज्ञान संस्कृती आणि शृंगार रहस्य सिद्धांत यासोबतच सादरीकरणात विविध शैली त्यांच्या परंपरा या सर्वांचा सुरेख संगम आपणास त्यांच्या साहित्यामधून दिसून येतो."

कार्यक्रमाची सुरुवात कवी कूलगुरु कालिदास यांच्या ग्रंथांचे पूजन करून करण्यात आली. अतिथी परिचय अवंतिका कुलकर्णी यांनी करून दिला.

याप्रसंगी ,प्रा. तानाजी घाडगे, प्रा. एस. बी. निम्बर्गी, प्रा. हर्षवर्धन पाटील, प्रा. शंकर कोमुलवार,प्रा. शिवराज देसाई, प्रा. सौ रश्मी कन्नूरकर आणि कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# जेईई मेन्समध्ये संगमेश्वरच्या मृण्मयीला ९९.३६ तर अथर्वला ९७.३८ पर्सेंटाइल

सोलापूर प्रतिनिधी (दिनांक १२ जुलै ) - राष्ट्रीय परीक्षा परिषद, दिल्ली यांच्या वतीने जानेवारी २०२२ मध्ये घेतलेल्या ऑनलाइन जेईई २०२२ परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.पर्सेंटाइल पद्धतीने यशस्वी विद्यार्थी-

मृण्मयी पवार ( ९९.३६ )
अथर्व कुलकर्णी ( ९७.३८)
मांतेश म्हेत्रे ( ९३.९४ )
यश ढाकणे ( ९०.०८ )
उत्कर्ष सवाईसर्जे ( ८९.९४ )
ऋषिकेश घोडके ( ८८.११ )
अक्षय कुंभार (८७.०८ )
कणाद देशपांडे ( ८५.४७ )
सिद्धार्थ ताकपेरे (८५.०५ )
अथर्व कनकी ( ८४.८९ )
पारस सदाफुले ( ८३.५२ )

हे सर्व विद्यार्थी जेइइ - ॲडव्हान्स या परीक्षेसाठी पात्र ठरले




या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना मृण्मयी पवार,अथर्व पवार या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार झाला त्याप्रसंगी सिद्धेश्वर पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिकार्जुन साखरे,समन्वय डॉ. गणेश मुडेगावकर, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. रामराव राठोड,तानाजी घाडगे, नागेश कोल्हे, रोहन डोंगरे,प्रशांत पाटील,मल्लिकार्जून पाटील, सिद्धाराम विजापूरे यांनी अभिनंदन केले.प्रा.लीना खमितकर यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.गणेश मुडेगावकर यांनी सर्वांचे आभार मानले.



# 'हर घर तिरंगा 'उपक्रमा अंतर्गत संगमेश्वर संकुलांच्या वतीने तिरंगा अभिवादन






**सोलापूर ( दिनांक १४ प्रतिनिधी )** 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत संगमेश्वर शिक्षण संकुलाच्या वतीने तिरंगा अभिवादन प्रभात फेरी काढण्यात आली. संगमेश्वर कॉलेज रात्र महाविद्यालय कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालय, संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी कॅडेटसोबत 'मेरा देश तिरंगा, मेरी जान तिरंगा' अशा घोषणेने परिसर दणाणून सोडला.

प्रारंभी संकुलाच्या वतीने सचिव धर्मराज काडादी यांचे स्वागत झाले. प्रास्ताविक प्राचार्य शोभा राजमान्य यांनी केले. त्यानंतर धर्मराज काडादी यांनी आपल्या मनोगतात 'क्रांतिकारकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य आपण अबाधित ठेवले पाहिजे' असे सांगत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. संतोष खेंडे यांनी प्रभात फेरीचा मार्ग स्पष्ट केला. त्यानंतर एनसीसीच्या वतीने सचिव,प्राचार्य आणि विद्यार्थ्यांना सुपूर्द करून प्रभात तरी मार्गस्थ करण्यात आली. ७ रस्ता, रंगभवन, हरीभाई प्रशाला, डफरीन चौक, काळजापूर मारुती इथं आली. गंगा निवास येथे पुष्पराज काडादी यांनी प्रभात फेरीचे स्वागत केले. कामत हॉटेल चौक मार्गे संकुलातील मैदानावर विसावली. याप्रसंगी प्राचार्य शोभा राजमान्य, प्राचार्य वैशाली अचकनळी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, प्राचार्य दीपक पाटील, उपप्राचार्य मेत्री, उपप्राचार्य वंदना पुरोहित, आर. व्ही.देसाई, मेजर चंद्रकांत हिरतोट, लेफ्टनंट शिल्पा लब्बा,जिमखाना विभाग प्रमुख आनंद चव्हाण सर्व विभाग प्रमुख यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सारीपुत्र तुपेरे यांनी सूत्रसंचालन केले तर उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# संगमेश्वर कॉलेजमध्ये 'हर घर तिरंगा' उपक्रमाअंतर्गत ध्वज वितरण



**सोलापूर (प्रतिनिधी)** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घरोघरी तिरंगा या उपक्रमांतर्गत संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) कनिष्ठ विभागाच्या वतीने विद्यार्थी -शिक्षक यांना तिरंगा ध्वजाचे वितरण आज कॉलेजच्या सभागृहात समारंभपूर्वक करण्यात आले.

याप्रसंगी 9 महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे मेजर सुभेदार गनबहादूर बुरुंग,मराठा रेजिमेंट एनएसजी कमांडो इन्स्टक्टर नायब सुभेदार व्यंकट गोमसाळे.मेजर चंद्रकांत हिरतोट, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, लेफ्टनंट शिल्पा लब्बा आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी प्रास्तविक मल्लिनाथ साखरे यांनी केले. मेजर हिरतोट यांनी ध्वजसंहिता सांगितली.गुरखा रेजिमेंटचे सुभेदार गनबहादूर गुरुंग यांनी मार्गदर्शन करून लष्कराच्या गुरखा बटालियनचे महत्व अधोरेखित केले. त्यानंतर ध्वनिचित्रफितीतून तिरंगा कसा लावावा. याची माहिती देण्यात आली.प्रतिनिधीक स्वरूपात विद्यार्थी आणि बसय्या हणमगाव, शिवशरण दुलंगे, रामराव राठोड, शिवराज पाटील यांना ध्वज प्रदान करण्यात आले.

सूत्रसंचालन सिद्धाराम विजापूरे यांनी केले तर आभार रामराव राठोड यांनी मानले.राष्ट्रगीतानंतर मैदानावर जिमखाना विभागाच्या वतीने तिरंगा अभिवादन घेण्यात आले. भारत माता की जय ,वंदे मातरमने वातावरण भारावून गेले होते.याप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



**या कार्यक्रमाची YouTube लिंक**
https://youtu.be/ARnjyktdHEE?si=aeWu0fg4RsqUonGF

# संगमेश्वरमध्ये अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी साजरा

## राष्ट्रवीरांच्या बलिदानाने मिळालेले स्वातंत्र्य अखंड ठेवणे आपले आद्य कर्तव्य -कर्नल एच. के.चौहान



**सोलापूर ( प्रतिनिधी )**

"भारतीय स्वातंत्र्याला त्याग आणि समर्पणाचा इतिहास आहे. अजरामर इतिहास आपण न विसरता भविष्यावर तीक्ष्ण नजर ठेवत कार्यरत राहिले पाहिजे. राष्ट्रवीरांच्या बलिदानाने मिळालेले स्वातंत्र्य अखंड ठेवणे आपले आद्य कर्तव्य आहे. " ९ महाराष्ट्र बटालियन, संगमेश्वर कॉलेजचे एनसीसीचे कर्नल एच. के. चव्हाण यांनी केले.ते संगमेश्वरमध्ये अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन प्रसंगी ध्वजवंदनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

प्रारंभी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी सुभेदार मेजर गनबहादुर गुरुंग, प्राचार्य दीपक पाटील,प्राचार्य वैशाली अचकनळी, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, डी. एम. मैत्री, वंदना पुरोहित, आर. व्ही. देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.



ध्वजवंदनानंतर प्राचार्य शोभा राजमान्य यांनी अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या उपस्थित यांना शुभेच्छा दिल्या . त्यानंतर संगमेश्वर शिक्षण संकुलात नव्याने रुजू झालेल्या शिक्षक प्राध्यापक यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर एनसीसी आणि सर्व संकुलाच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने 75 संख्येच्या भोवती मानवी साखळी करून तिरंग्याच्या साक्षीने राष्ट्राला मानवंदना देण्यात आली.या अभूतपूर्व कार्यक्रमातच देशभक्तीपर पोस्टर प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, राष्ट्रवंदना भित्तिपत्रकाचे उदघाटन अश्या कर्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संकुलातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसीचे विद्यार्थी, कमांडिंग ऑफिसर प्रामुख्याने होते.






स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# आझादी का अमृत महोत्सव



**या कार्यक्रमाची You Tube लिंक** https://youtu.be/9kIWSLG03vg?si=Rusj4RMxZm61tuWO

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त निबंधलेखन स्पर्धेचे बक्षीस वितरण

## विद्यार्थ्यांनी वाचना बरोबर जीवन अनुभवाने समृद्ध झाले पाहिजे - प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे

सोलापूर ( दिनांक १९ )
"महाविद्यालयात अनेक उपक्रमात सहभागी होताना विद्यार्थ्यांनी वाचना बरोबरच जीवन अनुभवाने समृद्ध व्हावे. एकीकडे जग मुठीत तंत्र युगाने आणले आहे त्या जगात आपली नोंद कशी निर्माण होईल याचा विचार करा. आधुनिक तंत्राने प्रगती झाली मात्र पिढी बरबादही झाली. अस्सल आणि कसदार हरवत चालले आहे. तरी पिढीबरबादिची कारणे शोधून वाचन, लेखन, मनन करताना जीवनाचा आनंद आपण घेतला पाहिजे.सोबत पाश्चात्त्य विद्यापीठातही कोणती संशोधने आहेत याचाही धांडोळा घेता घेता स्वतःचा शोध महाविद्यालयीन जीवनात घेतला पाहिजे."
असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. ते स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) कनिष्ठ विभागाच्या निबंध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा गौरव करताना बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे,प्रा. अशोक निंबर्गी मंचावर होते.प्रारंभी ग्रंथ पूजन करण्यात आले. प्रास्ताविका नंतर संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. तत्पूर्वी प्रा. डॉ. गणेश मुडेगावकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पाहुण्यांच्या मनोगतानंतर विद्यार्थ्यांचा रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी उपक्रमाचे कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले.




या कार्यक्रमाची You Tube लिंक https://youtu.be/Nzdq4LZvXVI?si=JLqt2swI2MytDooY

**निबंध लेखन स्पर्धेतील विजेते**
१)संध्या सिद्धाराम निबाळ
२) ऐश्वर्या किसन हावळे
३) सिद्धलिंग एस हासुरे
४) दिव्या रामा घागरे
५) स्नेहा रविकांत उपासे

**उत्तेजनार्थ**
१) अंबिका मल्लिकार्जुन हुल्ले
२) इरफान मुजावर तांबोळी
३)आमदार सिद्धाराम गायकवाड
४) साक्षी पांडुरंग शिंदे
५) सुहासिनी सुरेश डोके
६) अंजली सुरेश भोई
७) अभिषेक परसराम बर्वे
८) मेधा देशमुख
९) प्रीती महादेव कोळी
१०) ज्योती यल्लाप्पा कोळी
११) कोमल शैलेश चंदुकर

प्राचार्य शेंडगे पुढे म्हणाले की, " शिक्षण उपजीविकेचे साधन नक्की आहे, पण स्वप्नांच्या मागे धावताना आपण सुखी झालो का ? याला उत्तर साहित्यात मिळेल. साहित्यातून येणारे विषय आपण अभ्यासले पाहिजे. आपले धर्मग्रंथ आपण उघड्या डोळ्याने पाहिले. धर्म आणि जात मानणाऱ्या आजच्या जगात आपण राम, रहीम, कृष्ण अनुभवले पाहिजे. गाथा,गीता,ज्ञानेश्वरी याही ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. त्यांचे आकलन झाले तर जीवन समृद्ध होईल. किरण येले, गणेश मतकरी यासारख्या नव्या दमाच्या लेखकांचे लेखन तरुणाईला समृद्ध करेल. निरीक्षणशक्तीने आकलन वाढते. चैनीची निरीक्षणे आपल्या आजूबाजूला प्रचंड आहेत आपली तरुण पिढी दुर्दैवानं तिकडे वळते आहे, ही धोक्याची घंटा आहे .संगमेश्वरला मोठी नाट्य परंपरा आहे तरुणाईने या नाट्य परंपरेत यावे. जीवन सर्वस्पर्शी व्हावे यासाठी आपण प्रयत्नशील असावे." दैनंदिन वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.


यावेळी प्रा.तानाजी घाडगे, प्रा.रंगसिद्ध पाटील, प्रा.बसय्या हणमगाव,प्रा शहाजी माने,प्रा शंकर कोमुलवार,प्रा.विश्वनाथ कक्कळमेली,प्रा.हर्षवर्धन पाटील,प्रा.डॉ. श्रीदेवी पाटील, प्रा.संतोष पवार यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा सायबण्णा निम्बर्गी यांनी सर्वांचे आभार मानले.



**या कार्यक्रमाची** You Tube **लिंक** https://youtu.be/Nzdq4LZvXVI?si=JLqt2swI2MytDooY

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त संगमेश्वरमध्ये 'राष्ट्रवंदना' भित्तीपत्रिकेचे उद्घाटन

## देशभक्तीपर भित्तीपत्रिकेतून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती रुजते -डॉ. सुहास पुजारी




**सोलापूर (दिनांक ३० )** '' योगिक मुद्रेच्या द्वारे आपण आपले आरोग्य सुदृढ , उत्तम राखू शकतो. कोरोनाच्या काळात आपल्या श्वसनसंस्थेवर परिणाम करणाऱ्या विषाणूपासून बचाव करायचा झाल्यास प्रतिकार शक्ती वाढवावी लागेल. रोग मुक्ती योग शक्तीनेच होते त्यासाठी योग मुद्रा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. दररोज किमान 45 मिनिटे आहे याचा सहज म्हणून आपण केलेला वापर निश्चितपणे आपल्या प्रतिकारशक्तीमध्ये वाढ करण्यासाठी मदत करेल '' असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे योग अभ्यासक धनंजय सूर्यवंशी यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) जिमखाना विभाग आयोजित , योगिक मुद्रा आणि त्यांचे महत्व या विषयावरील योग प्रात्यक्षिकाच्या व्याख्यानामध्ये बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉलेजच्या प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य होत्या.

प्रारंभी जिमखाना विभागाच्या ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून खेळाचे महत्व अधोरेखित केले.त्यानंर कार्यक्रमास प्रारंभ झाला. यामध्येच भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कोरोना काळातील दक्षता घेण्यासाठी आवश्यक त्या नियमांची कास आपण धरली पाहिजे. या आवाहनास प्रतिसाद देत घोषवाक्यांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्यावतीने त्यांचे स्वागत झाले.जिमखाना विभाग प्रमुख प्राध्यापक आनंद चव्हाण यांनी दूरदृष्टी प्रणालीद्वारे उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत वक्त्यांचा परिचय करून दिला.

**या कार्यक्रमाची You Tube लिंक**
https://youtu.be/tf2BwfSKqHI?si=HqHLy6yHdz2pPCZt

# हर घर तिरंगा उपक्रमाची क्षणचित्रे












# हर घर तिरंगा उपक्रमाची क्षणचित्रे











## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने पोस्टर प्रेसेंटेशन आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.





# स्वातंत्र्याच्या अमृमहोत्सवानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले






# शहर वाहतूक शाखा यांच्या वतीने 'रस्ता सुरक्षा सप्ताह' निमित्त पथनाट्यातून प्रबोधन

शहर वाहतूक शाखा यांच्या वतीने "रस्ता सुरक्षा सप्ताह" निमित्त संगमेश्वर महाविद्यालय,सात रस्ता परिसरात विद्यार्थी,पालक व नागरिकांकरिता पथ्यनाट्य याचे सादरीकरण करण्यात आले। यांद्वारे विविध महत्वाच्या विषयावरती सर्वांचे प्रबोधन करण्यात आले. या प्रसंगाचे काही क्षणचित्रे...प्रमुख उपस्थिती:- नागेश होटकर (सहा पोलीस निरीक्षक), श्री आदलिंगे (पोलीस सहनिरीक्षक), पोलीस कॉन्स्टेबल कुणाल गायकवाड






# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त आयोजित जिल्हास्तरीय 'स्वच्छ महाविद्यालय पुरस्कार-२१-२२'

स्वच्छ भारत-स्वच्छ महाविद्यालय

दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने संगमेश्वर महाविद्यालयास देण्यात आला. समाज कल्याण केंद्र, सोलापूर येथे आयोजित कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री दिलीप स्वामी यांच्या हस्ते हा पुरस्कार पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देण्यात आले .कोविड कालावधीमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी राबवण्यात आलेले उपक्रम घेतलेली काळजी तसेच परिसर स्वच्छता याबाबतीत उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले.शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी ऑफिस स्टाफ सर्वांच्या सहकार्याने हा पुरस्कार मिळाला. मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा..!






**स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त संगमेश्वर महाविद्यालयात ' नॅशनल युथ डे ' निमित्त जिल्हा न्याय प्राधिकरणचे न्यायाधीश श्री नरेंद्र नरसिंह जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना त्यांनी ' आम्ल पदार्थ मुक्त भारत ' यासंदर्भामध्ये प्रतिज्ञा दिली या प्रसंगाची काही क्षणचित्रे...**







## संगमेश्वरमध्ये अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे स्वागत

# गुणवत्तापूर्ण वाटचालीत अनेकविध उपक्रमात सहभागी व्हा.

### - उपप्राचार्य प्रसाद कुंटे



सोलापूर ( दिनांक २९ ) " संगमेश्वरच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या वाटचालीत आपले स्वागत करतो. या दोन वर्षांच्या वाटचालीत अनेक विविध उपक्रमात सहभागी व्हा. आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्या.अभ्यासासोबत खूप खेळा, वाचा, मोठे व्हा." असे सांगत उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित अकरावी विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ प्रसंगी बोलत होते. मंचावर पर्यविक्षक मल्लिनाथ साखरे, विज्ञान विभाग समन्वयक रामराव राठोड,कला विभाग समन्वयक शिवशरण दुलंगे,वाणिज्य विभाग समन्वयक बसय्या हणमगाव उपस्थित होते. विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ काल कॉलेजच्या बी १ सभागृहात पार पडला.

प्रारंभी संगमेश्वर गीत झालं. विभाग प्रमुख यांनी प्रास्ताविक करुन सूचना केल्या. प्रगती अहवाल सादर झाल्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात दहावीतील अव्वल असलेल्या गुणवंतांचा तसेच सध्या बारावीत असलेल्या अकरावीतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पर्यवेक्षकांनी शिस्तपालन, युनिफॉर्म, यासह वाहतुकीच्या नियमांचे महत्व अधोरेखित करत आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी सर्व विभाग प्रमुख,विषय शिक्षक आदी उपस्थित होते.तीन विभागातल्या कार्यक्रमांचं सूत्रसंचालन प्रियांका पाटील, दत्तात्रय गुड्डेवाडी,संगीता म्हमाणे यांनी केले तर आभार प्रशांत शिपी, विश्वनाथ कक्कलमेली,बाबासाहेब सगर यांनी मानले.



# संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतला नळदुर्गचा भुईकोट किल्ला
## क्षेत्रभेटी अंतर्गत कला शाखेचा ऐतिहासिक स्थळ भेटीचा उपक्रम



**सोलापूर ( प्रतिनिधी )** क्षेत्रभेटी अंतर्गत कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याला भेट दिली.या उपक्रमाअंतर्गत संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या इतिहास विभाग कला शाखेतील विद्यार्थ्यांनी नळदुर्गच्या भुईकोट किल्ल्याचा परिसर जाणून घेतला. प्रारंभी कॉलेजच्या वतीने सूचना काढण्यात आली लगेच विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.सहल मार्गस्थ होण्यापूर्वी उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. शंकर कोमुलवार यांनी माहिती देताना सांगितले की, " किल्ल्याचे मुख्य तीन प्रकार असतात त्यातील एक भुईकोट किल्ला. किल्ल्याचा भौगोलिक विस्तार पाहिला तर एकशे चार एकरात हा किल्ला असून या किल्ल्यात ११४ बुरुज आहेत. प्रवेशद्वार प्रवेशद्वाराच्या पुढचे दोन तोफ, मुन्सफ कोर्ट , तुरुंग, उपळ्या बुरुज, राणीमहल, पवनचक्की, नर – मादी धबधबा याचे स्थापत्य स्थापत्याच्या दृष्टीने वेगळे महत्व इतिहासात आहे. हा किल्ला मूळ चालुक्यांनी बांधला. त्यानंतर बहामनी सत्तेने या किल्ल्याचा कायापालट निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने केला. शेवटी शेवटी तो हैदराबादच्या निजामाच्या ताब्यात होता. स्थापत्य शैली आणि पाण्याच्या धबधब्याच्या हा भुईकोट किल्ला महत्त्वपूर्ण आहे".

क्षेत्रभेटी अंतर्गत नियोजित सहलीत एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.कला शाखा समन्वयक शिवशरण दुलंगे, अनिता अलकुंटे , रश्मी कन्नूरकर,रंगसिद्ध पाटील, हर्षवर्धन पाटील, शहाजी माने, दत्तात्रय गुड्डेवाडी,शिवराज देसाई,विश्वनाथ कक्कळमेली, विठ्ठल अरबाळे यांचा सहभाग होता.



# संगमेश्वर शिक्षण संकुलातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात



**-सोलापूर ( क्रीडा प्रतिनिधी )** श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित, संगमेश्वर पब्लिक स्कूल ,संगमेश्वर कनिष्ठ ,वरिष्ठ, रात्र महाविद्यालय,चित्रकला महाविद्यालय, बीबीए ,बीसीए विभाग यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साह साजरा झाला.२९ ऑगस्ट मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आंतरवर्गीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य यांच्या झाले.याप्रसंगी संगमेश्वर पब्लिक स्कूलचे प्राचार्य सौ.गायत्री कुलकर्णी ,रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली अचकनळी,उपप्राचार्य प्रा.प्रसाद कुंटे, प्रा.डॉ.ऋतुराज बुवा, प्रा.डॉ. वसंत कोरे आणि विविध विभागाचे समन्वयक यांची उपस्थिती होती.प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य ,प्राचार्य सौ.गायत्री कुलकर्णी यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने सर्व खेळाडू,उपस्थितांना शुभेच्छा देऊन हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा जगतातील योगदानाचा आढावा घेतआपले मनोगत व्यक्त केले.

याच कार्यक्रमात ज्युडो आणि कराटेच्या विद्यार्थिनींनी मुलींनी स्वसंरक्षणासाठी कशा पद्धतीने संकटांना सामोरे गेले पाहिजे यासंदर्भातले निसर्ग करमाळकर,प्रीती अणचे, प्रचीता जोगदांडे यांनी कराटे प्रात्यक्षिक दाखवले.

राष्ट्रीय क्रीडा दैनंनिमित्त आयोजित स्पर्धेमध्ये १०० मीटर धावणे, गोळा फेक व सूर्यनमस्कार या तीन खेळांच्या स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डी. एम. मैत्री व रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली अचकनळी यांच्या उपस्थितीत झाला.

प्रारंभी प्रतिमा पूजन झाले. प्रास्तविक जिमखाना विभागप्रमुख प्रा.आनंद चव्हाण यांनी केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. विक्रांत विभुते, शितल ख्याडे ,वैदेही गोरे, प्रा. शिवराज पाटील ,प्रा.संतोष पवार, नरेंद्र आगलावे, उमाकांत जाधव, राजेंद्र तोळणुरे ,अण्णा निंबाळकर,दत्ता लोहार, अनिल परचंडे व सागर यांनी कार्य केले.उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रशांत बिराजदार तर शेवटी बक्षीस वितरणाचे अहवाल वाचन प्रा.संतोष खेंडे यांनी केले ,आभार प्रा.शरण वांगी यांनी मानले.

**अंतिम निकाल**

पुरस्काराचे स्वरूप

मेडल ,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ

संगमेश्वर पब्लिक स्कूल – १०० मी धावणे मुले

१) सागर शेटे
२) सुरज पुजारी
३) अंकुर कोरे

संगमेश्वर पब्लिक स्कूल – १०० मी धावणे मुली

१) श्रुती सुरसे
२) प्रेरणा हरीदास
३) पलक भोसले

संगमेश्वर कॉलेज – १०० मी धावणे मुले

१) तौसिफ़ नदाफ
२) सचिन म्यानाळे
३) प्रणव थावरे

संगमेश्वर कॉलेज – १०० मी धावणे मुली

१) सौंदर्या माने
२) प्राजक्ता घाटे
३) रेयान पाटील

संगमेश्वर पब्लिक स्कूल – सूर्यनमस्कार मुली

१) भारती शिवगुंडे
२) श्रुष्टी कलशेट्टी
३) आरुषी लवंगे

संगमेश्वर कॉलेज – सूर्यनमस्कार मुले

१) आदित्य पांडे
२) ऋषिकेश राऊत
३) तीर्थराज सरसंबी

संगमेश्वर कॉलेज – सूर्यनमस्कार मुली

१) नंदिनी राठोड
२) राधिका सुरवसे
३) साक्षी पाटील

संगमेश्वर पब्लिक स्कूल – गोळाफेक मुले

१) आशुतोष नेल्लारे
२) सुरज पुजारी
३) आदित्य मेढेकर

संगमेश्वर पब्लिक स्कूल – गोळाफेक मुली

१) प्रसाद सुमन
२) अदिती तारळकर
३) नेत्रा कलशेट्टी

संगमेश्वर कॉलेज – गोळाफेक मुले

१) विनायक व्हनखेडे
२) अभिजीत सुरवसे
३) अभय पाटील

संगमेश्वर कॉलेज – गोळाफेक मुली

१) रुपाली पाटील
२) सलोनी बनकर
३) मनीषा उन्हाळे



# संगमेश्वर शिक्षण संकुलातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा झाला.त्याची क्षणचित्रे
















श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित

# संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

S.E.S. SOCIETY SOLAPUR
"Work is Worship"

SANGAMESHWAR JEE, NEET, NATA, CET CELL

# NEET 2023
## REPEATERS - BATCH

**New Batch Begins From**
**15 September 2022**

**What is 12th SCIENCE NEET REPEATERS BATCH - 2023 ?**

- All Key Concept Covered Across all Subjects: PCB.
- Specially Designed Research Based Study Material For NEET.
- Expert & Experienced Faculty Members.
- Daylong Supervised Study Sessions : Every Day 1.5 Hrs (Per Subject), 6 Days Teaching.
- Daily Doubt Clearing Session, DPP, Weekly Tests, Topic wise & Complete Syllabus Tests.
- Chapterwise Test Series, Part Tests, Mock Tests
- 300 Tests in 250 Days
- Previous Years Question Paper Discussion.
- Mobile App. For Online Tests & Continues Feedback Mechanism.
- Result Analysis, Parents Meeting, Open House, Motivational Lectures.

Address : SIP Cell, Sangameshwar Public School, Pre Primary School Building, Opp. Big Bazar, Saat Rasta, Solapur 413 001

**For More Details Contact**

Pravin Sir 9096271201

Dr. Ganesh Mudegaonkar 9421440940

For Registratation Visit : www.sangameshwarcollege.in

संचार
dailysanchar@gmail.com
• Sunday, September 25, 2022 • सोलापूर • रविवार, २५ सप्टेंबर २०२२ www.esanch
सोलापूर, रविवार, २५ सप्टेंबर २०२२ ५

# संगमेश्वर पब्लिक स्कूल समूहगान स्पर्धेत विजयी



▶ सोलापूर: भारत विकास परिषदेच्या समूहगान स्पर्धेत संगमेश्वर पब्लिक स्कूलचा विजयी झालेला संघ.

संचार प्रतिनिधी

▶ **सोलापूर, दि.२४-** भारत विकास परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या समूहगान स्पर्धेत संगमेश्वर पब्लिक स्कूलचा संघ विजयी ठरला.

या स्पर्धेत एकूण दहा शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत 'वंदे भारत मातरम' हे हिंदी गीत तर 'मनसा सततम स्मरणियम' हे संस्कृत गीत विद्यार्थिनींनी सादर केले. या दोन्ही गीतांना प्रथम क्रमांक मिळाला. त्यांना तबल्यावर करण भोसले यांनी साथ केली तर संगीतशिक्षक बळवंत जोशी यांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजयी झालेल्या संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या संघास उद्या (रविवारी) पुणे येथे होणाऱ्या प्रांतीय स्पर्धेसाठी जाण्याची संधी मिळाली आहे. या संघात समृद्धी जगताप, जोसेफीया मुर्शिद, आयुष धायगुंडे, रेवा कुलकर्णी, श्रुती बंडगर, अंजली बघेल आणि दिशा डिग्गे या विद्यार्थिनींचा सहभाग आहे.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलित करण्यात आली. नंतर वंदे मातरमने कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय सोलापूरच्या केंद्रप्रमुख राजयोगिनी ब्रह्माकुमारी, उज्ज्वला बहनजी, स्वामी विवेकानंद केंद्र कन्याकुमारीचे सोलापूर सहनगरप्रमुख विजय मेरगू, भारत विकास परिषदेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष जितेश कुलकर्णी, जिल्हा संघटक महादेव न्हावकर, क्षेत्रीय सचिव श्रीकांत कुलकर्णी उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रत्येक संघाने प्रथम सत्रात हिंदी व दुसऱ्या सत्रात संस्कृत गीत सादर केले. यात संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या संघाने प्रथम क्रमांक, हरिभाई देवकरण प्रशालेने द्वितीय तर स.हि.ने. प्रशालेने तृतीय क्रमांक पटकाविला. बाकीच्या संघांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा.चंद्रशेखर तेलंग (मुंबई), मयूर स्वामी (अक्कलकोट), श्रीनिधी देशपांडे यांनी काम पाहिले. शेवटच्या सत्रात झालेल्या पारितोषिक वितरण समारंभास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगीत विभागप्रमुख डॉ.दीपक दाभाडे उपस्थित होते. डॉ. दाभाडे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या ११३ व्या जयंतीदिनी आयोजित ऑनलाइन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे अक्षय इळके, यश पाटील विजेते






अक्षय इळके



यश पाटील

**सोलापूर (दिनांक १५)**
दैनिक संचार प्रबोधन मंच,संगमेश्वर कॉलेज ( स्वायत्त )आणि कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजितकर्मयोगी अप्पासाहेब काडादी जयंती प्रीत्यर्थ ऑनलाइन महाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा आज संपन्न झाली. राज्यभरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. उस्फुर्त वक्तृत्व स्पर्धेतअध्यात्म,धर्म,अर्थव्यवस्था,कला,साहित्य,संगीत यासह समाजातील सर्वच स्तरावरील आपले विषय वैविध्यपूर्ण पद्धतीने मांडले.

**निकाल**
प्रथम - अक्षय इळके (नाईट कॉलेज, इचलकरंजी), द्वितीय क्रमांक - यश रवींद्र पाटील ( बी. के. बिर्ला कॉलेज, मुंबई) तृतीय क्रमांक - प्रसाद देविदास जगताप( झेड. बी. पाटील कॉलेज, धुळे) चतुर्थ क्रमांक- तेजस्विनी संजय पांचाळ (नाईट कॉलेज, इचलकरंजी ) पाचवा क्रमांक- मिथुन दत्तात्रय माने ( एल. बी.एस. कॉलेज, सातारा) सहावा क्रमांक विभागून - प्रज्ञा श्रीकांत माळकर ( गरवारे कन्या कॉलेज, सांगली ) सहावा क्रमांक विभागून - विभागून ऐश्वर्या सुरडे ( एल.बी.पी. महाविद्यालय, सोलापूर) उत्तेजनार्थ - विनोद हनुमंत मोरे ( पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर )



# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या ११३ व्या जयंतीदिनी आयोजित...


**पारितोषिके**
प्रथम क्रमांक – १५०० रुपये
द्वितीय क्रमांक – १००१ रुपये
तृतीय क्रमांक – ७०१ रुपये
चौथा क्रमांक – ५०१ रुपये
पाचवा क्रमांक – ४०१ रुपये
सहावा क्रमांक – ३०१ रुपये
उत्तेजनार्थ दोन प्रशस्तिपत्रके

प्रारंभी संगमेश्वर कॉलेजच्या आवारात झालेल्या उदघाटन सत्रात सकाळी ८.४५ वाजता कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांना अभिवादन करून यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. मराठी विभाग प्रमुख डॉ.सुहास पुजारी यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. उपस्थित परीक्षक प्रा. भागवत देशमुख आणि प्रा. वैभव दुध्याल यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य, रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य वैशालीअचकनळी, कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्थेचे प्रा. बी. एन. पटणे आदी मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटन सत्रात सूत्रसंचालन करून सूचना आणि तांत्रिक बाबी प्रा.संतोष पवार यांनी स्पष्ट केल्या.

त्यानंतर स्पर्धेस सुरुवात झाली.

स्पर्धा यशस्वितेसाठी प्रा. राजकुमार खिलारे, प्रा. शीला रामपुरे डॉ. मंजू संगेपाग, प्रा.एस बी निंबर्गी, रविशंकर कुंभार आदींनी सहकार्य केलं तर तंत्र सहाय्यक म्हणून संतोष फुलारी यांनी सहाय्य केले.डॉ.सुहास पुजारी यांनी शेवटी निकाल घोषित केला. या ऑनलाईन चाललेल्या वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन शिवराज पाटील यांनी तर उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी केले तर प्रा. सुहास दहिटणेकर यांनी मानले.







**या कार्यक्रमाची** You Tube **लिंक**
https://www.youtube.com/live/ZEa2a6vMCoo?si=lumZklLFlYyz2GQ2

# शालेय जीवनातील वक्तृत्वाने व्यक्तिमत्व घडते

**- राजेंद्र दासरी**

## संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण



मुलांच्या शालेय जीवनातील क्तृत्वाने व्यक्तिमत्व घडते त्यातून उत्तम वाचन, चिंतन, मनन होते. याचा उपयोग मुलांच्या पुढील आयुष्यातील सर्वांगीण विकासासाठी होतो'' असे प्रतिपादन आकाशवाणी सोलापूर केंद्राचे कार्यक्रमविभाग प्रमुख राजेंद्र दासरी यांनी केले. ते संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या वक्तृत्व,रंगभरण आणि पत्रलेखन स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी शालेय समिती सदस्या शितल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी संगीत शिक्षक बळवंत जोशी यांनी ईशस्तवन सादर केले. त्यानंतर गायत्री कुलकर्णी यांनी या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकानंतर कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून , दिपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार पब्लिक स्कूलच्या वतीने झाला.त्यानंतर बक्षीस वितरण झाले. बक्षीस वितरण झाल्यांनंतर समृद्धी अविनाश आलदर वैष्णवी हणमंत यळमेली आणि गायत्री अंकुश गाडेकर या विद्यार्थ्यांनी आपले वक्तृत्व सादर केले.

# संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण

**निकाल* – रंगभरण स्पर्धा**
लहान गट – मोठा गट – प्रथम – समीक्षा सुभाष नावदगिकर (दमाणी विद्यामंदिर) द्वितीय – स्वराली प्रदीप हणमशेट्टी ( श्री वीरतपस्वी ) तृतीय – हर्ष रवी मस्के (दमाणी विद्यामंदिर )
गट – इयत्ता १ ली २ री – अनुज नागराज कोलार ( दमाणी विद्यामंदिर ) दुसरा अंजली ठेंगे ( संगमेश्वर पब्लिक स्कूल) तृतीय गंगाश्री मल्लिकार्जुन सोन्ना (दमाणी विद्यामंदिर )
गट – इयत्ता ३री ४ थी – प्रथम – कार्य मोरे ( संगमेश्वर पब्लिक स्कूल) द्वितीय – अवनी आनंद सामल ( दमाणी विद्यामंदिर ) तृतीय – श्रीपाद नामदेव कंधारे ( संगमेश्वर मॉन्टेसरी )
मराठी पत्र लेखन स्पर्धा – गट पाचवी सहावी– प्रथम – अक्षरा विजयकुमार चौगुले ( दमाणी विद्यामंदिर ) द्वितीय – वर्धन राम दगड ( दमाणी विद्यामंदिर) तृतीय – रोहिणी कपिलकुमार चौगुले ( नीलकंठेश्वर प्रशाला)
गट इयत्ता सातवी आठवी – प्रथम – तनिष्का विनोद अभीवंत ( संगमेश्वर पब्लिक स्कूल ) द्वितीय – साक्षी मारुती धर्मसाले ( सिद्धेश्वर प्रशाला ) तृतीय– संकेत संतोष तगारे ( दमाणी विद्यामंदिर )
गट नववी – दहावी – प्रथम – इरेश संगप्पा मणूरे ( सिद्धेश्वर प्रशाला) द्वितीय – प्रज्वल अशोक हुले ( सिद्धेश्वर प्रशाला ) तृतीय – अमृता बसवराज कलबुर्गी ( सिद्धेश्वर कन्या प्रशाला)
इंग्रजी पत्र लेखन स्पर्धा
गट पाचवी सहावी– प्रथम – के मीनाक्षी ( संगमेश्वर पब्लिक स्कूल ) द्वितीय – मृणाल वैभव इंगळे ( संगमेश्वर पब्लिक स्कूल) तृतीय– सेजल संतोष जोशी ( सिद्धेश्वर मॉन्टेसरी )
गट इयत्ता सातवी आठवी – प्रथम – श्रीवर्धन व्यंकटेश बुरा ( संगमेश्वर पब्लिक स्कूल ) द्वितीय – गार्गी अंबादास खराडे ( श्री वीरतपस्वी ) तृतीय– तन्वी बाबा ( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल )
गट नवीन दहावी – प्रथम – साक्षी बिराजदार ( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम) द्वितीय – योगिता येदुर (सिद्धेश्वर इंग्लिश मिडीयम ) तृतीय– आरुषी सचिन शिवशेट्टी ( सिद्धेश्वर प्रशाला )
मराठी वक्तृत्व स्पर्धा
गट पाचवी सहावी – प्रथम– समृद्धी अविनाश आलदर ( एस. आर. इंग्लिश हायस्कुल ) द्वितीय – स्वरांजली रामेश्वर रुके ( शरदचंद्र पवार प्रशाला ) तृतीय– आर्या अविनाश सुरडे ( सिद्धेश्वर कन्या प्रशाला)
गट इयत्ता सातवी आठवी – प्रथम – गायत्री अंकुश गाडेकर शरदचंद्र पवार प्रशाला ) द्वितीय – साई महेश पिंपळेकर ( दमाणी विद्यामंदिर ) तृतीय– नारायणी ओमकार कुलकर्णी ( एस. आर.चंडक इंग्लिश हायस्कूल)
गट नववी दहावी– प्रथम – वैष्णवी हनुमंत येळमेली (सिद्धेश्वर कन्या प्रशाला) द्वितीय – दीपक अनिल चडडे ( विद्यानिकेतन प्रशाला) तृतीय– कीर्तना दत्तात्रय पल्लाटी ( दमाणी विद्यामंदिर )
इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा –
गट इयत्ता पाचवी सहावी – प्रथम– अंजली शिवानंद धनुरे ( सुयश सेंट्रल स्कूल) द्वितीय– शलाका मठ ( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल) तृतीय संतोष शिंदे (सिद्धेश्वर मॉंटेसरी )
गट इयत्ता सातवी आठवी– प्रथम – मिहीका स्वप्नील मर्दा ( एस. आर. चंडक) दुसरा– तस्किन समीरअहमद कलबुर्गी ( आयडियल उर्दू मीडियम ) तृतीय – कोंडून वेंनेला जयराम ( श्री वीरतपस्वी )
गट इयत्ता नववी दहावी – प्रथम – हीनल चेतन पटेल ( एस. आर. चंडक) द्वितीय – सृष्टी बिराजदार
( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल) तृतीय– वर्षा प्रमोद जालनापुरे (विद्यानिकेतन प्रशाला )
विजेत्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह आणि अनुक्रमे सातशे, पाचशे, तीनशे अशी रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.या स्पर्धेत एकूण ३१० स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पूर्वा पुजारी, मोहिनी ताकटे, रेवणसिद्ध हालोळी, शिवराज देसाई, सविता बिराजदार, सरस्वती बताले, गीता मगाई, अश्विनी कुलकर्णी यांनी परीक्षण केले.
स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. दिपाली करजगीकर ,प्राचार्य संतोष पाटील, शोभा गोटे, वैष्णवी देशपांडे, हरीश पुटटा, वीणा अन्नलदास, मेहजाबिन सय्यद यांनी सहकार्य केले. याप्रसंगी शहर आणि जिल्ह्यातील विद्यार्थी, सह–शिक्षक तसेच संगमेश्वर पब्लिक स्कूलचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.रजनी वेदपाठक यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, सूत्रसंचालन सलोचना पुजारी यांनी केले तर प्रीती वळसंगे यांनी सर्वांचे आभार मानले.

# संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण...




कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त संगमेश्वर पब्लिक स्कूल आणि आकाशवाणी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध स्पर्धातील विजेत्यांना गौरविण्यात आले. त्याप्रसंगी कार्यक्रम विभागप्रमुख राजेंद्र दासरी,शितल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी विजेते.

**या कार्यक्रमाची You Tube लिंक**
https://youtu.be/qbUSvSPtEMs?si=ExLJGkNRo7UrjYfA



# सातत्यपूर्ण योग्य सरावाने क्रीडा क्षेत्रात उत्तम करियर - अनिल पाटील

# संगमेश्वर ज्युनियर कॉलेजमध्ये क्रीडा क्षेत्रावर व्याख्यान



**सोलापूर (क्रीडा प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांनी मैदानावर सातत्यपूर्ण योग्य दिशेने सराव केला तर क्रीडा क्षेत्रातून ही आपली उज्ज्वल करियर होऊ शकते. त्यासाठी नियोजना सोबत कठोर परिश्रमाची गरज आहे.'' असे प्रतिपादन मुख्याध्यापक क्रीडा प्रशिक्षक अनिल पाटील यांनी केले. ते संगमेश्वर ज्युनियर कॉलेजमध्ये क्रीडा क्षेत्रातील करियर या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. मंचावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे, जिमखाना विभागप्रमुख प्रा. आनंद चव्हाण, कला शाखा समन्वयक शिवशरण दुलंगे आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रथम शब्द सुमनाने सर्वांचे स्वागत झाले. त्यानंतर संगमेश्वर गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रमुख वक्त्यांचे कॉलेजच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत झाले. त्यानंतर प्रा. आनंद चव्हाण यांनी प्रास्ताविकात क्रीडा प्रकारानुसार संगमेश्वरमधील संधी सांगितल्या. त्यानंतर अनिल पाटील यांनी संवाद साधला. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य यांनी या क्रीडा उपक्रमाचे कौतुक करत उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी शहाजी माने, रंगसिद्ध पाटील, शंकर कोमुलवार, हर्षवर्धन पाटील, विश्वनाथ कक्कळमेली, प्रकाश कतनळी, संतोष पवार,विठ्ठलअरबाळे यांच्यासह कला शाखेतील प्राध्यापक- विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष खेंडे यांनी केले तर आभार विक्रांत विभूते यांनी मानले.

**या कार्यक्रमाची You Tube लिंक**
https://youtu.be/fO9hToE9Ims?si=TzvUYxHYX1MhT95d

# चित्रप्रदर्शन व प्रात्यक्षिक

## कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचा उपक्रम



**सोलापूर ( प्रतिनिधी )** प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही कला महाविद्यालयात श्री गणेश चतुर्थी निमित्त चित्रप्रदर्शन व प्रात्यक्षिकाचे आयोजन केले आहे. श्री गणेशाची प्रतिष्ठापना झाल्यानंतर चित्रप्रदर्शनाचे उदघाटन सचिव धर्मराज काडादी यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास संगमेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,उपप्राचार्य प्रसाद कुंटे,चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दिपक पाटील ,प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

काल दिनांक १ सप्टेंबर रोजी प्रख्यात चित्रकार प्रकाश पोरे यांचे प्रात्यक्षिक झाले.यात त्यांनी रंगसंगतीबरोबर ,रेखाटनातील बारकावे,विविध माध्यमातील चित्र याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ३ सप्टेंबर रोजी चित्रकार विनायक घाडगे यांचे कॅलिग्राफिकचे प्रात्यक्षिक होणार आहे.सुलेखनातील बारकाव्यांसोबत कॅलिग्राफिक क्षेत्रातील संधी याविषयी ते मार्गदर्शन करणार आहेत.

या प्रात्यक्षिकाचा आणि विद्यार्थ्यांच्या चित्रप्रदर्शनाचा काल रसिकांनी लाभ घ्यावा. हे चित्रप्रदर्शन विनामूल्य असून दिनांक १ ते ४ सप्टेंबर पर्यंत सकाळी आठ ते दुपारी दोन वाजेपर्यंत सर्वासाठी खुले आहे. एलिमेंटरी व इंटरमिडियट परीक्षा देणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनीही लाभ घ्यावा असे आवाहन चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दिपक पाटील यांनी केले आहे.

